## आदेश निशाणी क्र.६ वर

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ कलम १ व २ नुसार प्रतिवादीने वादीचे दावा मिळकतीतील कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा करु नये म्हणुन प्रस्तुत दाव्याच्या निकाला पावेतो तुर्तातूर्त मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**वादीचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :–**

२. **मिळकतीचे वर्णन**

**अ)** तुकडी जिल्हा जळगांव पोट तुकडी तालुका चाळीसगांव पैकी मौजे तरवाडे शिवारातील शेत जमिन गट क्र.१/क/क१/अ क्षेत्र ०.६४ आर, आकार ३रु. १० पैसे यांसी चतुःसिमा खालील प्रमाणे :–

**पुर्वेस** – मधुकर चिंतामण पावले (वादी यांची शेतजमिन)

**पश्चिमेस** – नाला,

**दक्षिणेस** – तरवाडे–करगाव रस्ता,

**उत्तरेस** – निंबा चिंतामण पावले यांची शेतजमिन

**ब)** तुकडी जिल्हा जळगांव पोट तुकडी तालुका चाळीसगांव पैकी मौजे तरवाडे शिवारातील शेत जमिन गट क्र.१/क/क/२ क्षेत्र १ हे. ६७ आर, आकार ८ रु. १० पैसे यांसी चतुःसिमा खालील प्रमाणे :–

**पुर्वेस** – राजेंद्र भगवान भावसार यांचे शेत

**पश्चिमेस** – निंबा चिंतामण पावले यांची शेत,

**दक्षिणेस** – तरवाडे–करगाव रस्ता,

**<u>उत्तरेस</u>** – महादू विठ्ठल गवळी यांची शेतजमिन

येणेप्रमाणे चतुःसिमेतील शेतजमिन तदंगभुत वस्तुंसह झाडा–झुडुपासह, दगड, माती, विहिर, इलेक्ट्रीक मोटार सह येथुन पुढे सदर मिळकतींना '**दावा मिळकती**' असे संबोधण्यात येईल.

३. वादीचे कथनानुसार, वस्ती तरवाडे, ता. चाळीसगांव येथील शेतजमिन गट क्र. १/क/क१ क्षेत्र १ हे. ६७ आर ही शेतजमिन वादी व प्रतिवादीचे वडील मयत निंबा चिंतामण पावले यांची एकत्र हिंदु कुटुंबाची शेत जमिन होती. वादीचे वडील चिंतामण यादव पावले मयत झाल्यानंतर वादीची आई सुपडाबाई चिंतामण पावले यांचे नाव सदर शेतमिळकतीस एकुक म्हणून लागले होते. सदर मिळकतीची वादी व प्रतिवादीचे वडील निंबा चिंतामण पावले यांच्या दरम्यान दि. ०४.०३.२००५ रोजी वाटणी होऊन त्यानुसार दावा कलम १अ यात वर्णन केलेली शेतमिळकत ही वादीचे वाटणीस व शेतजमिन गट क्र. १क/क/१/ब चे क्षेत्र १ हे. ०३ आर, आकार ५ रु. ०० पैसे ही शेतजमिन प्रतिवादीचे वडील निंबा चिंतामण पावले यांच्या वाटणीस आली असून वादीची आई सुपडाबाई हिला तिच्या हिश्यापोटी वादी व प्रतिवादीचे वडील यांनी एकूण रक्कम रु.२०,०००/– रोख दिलेले आहे. सदरचे वाटणीपत्र हे नोंदणीकृत असून त्यावर सरकारी दप्तरी नोंद होवुन वादी व प्रतिवादीचे वडील निंबा चिंतामण हे ज्याच्या त्याच्या हिश्याच्या जमिनी खेडत आलेले आहे.

४. वादीचे पुढे कथन असे की, वादी हा सन १९८३ पासुन हेल्पर खलाशी म्हणून नोकरीस होता. त्यावेळी वादीची आई ही त्याच्याकडेच राहत होती. वादी याने त्याच्या नोकरी उत्पन्नातुन दावा कलम क्र. १ ब यात वर्णन केलेली शेतजमिन दि. ११.०३.१९९७ रोजी श्री. सुनिल देवराम भावसार यांच्याकडून रक्कम रु. १,५८,०००/– वर खरेदी घेतली. त्यावेळी आईचा मान म्हणून वादीने त्या जमिनीचे खरेदीखत आईचे नावाने करुन घेतले परंतु आईचे मृत्यु नंतर पुढे वाद नको म्हणून वादीच्या आईने सदरची शेतजमिन दि. ०७.०१.१९९९ रोजी कार्यकारी दंडाधिकारी सो चाळीसगांव यांच्या समक्ष विनामुल्य हक्कसोड वाटणीद्वारे वादीच्या नावाने करुन दिली व तहसिलदार यांच्या

आदेशान्वये नोंद क्र. २८०८ ने वादीच्या नावावर झाली. सदरची शेतजमिन ही खरेदी घेतल्यापासुन वादीचे कब्जे उपभोगात होती व आहे. सदर मिळकतीचे मुळ खरेदी खत हे देखील वादीकडेच आहे. सदर मिळकतींशी प्रतिवादीचा कोणताही हक्क व अधिकार अगर हितसंबंध नव्हता व नाही.

**५.** वादीचे कथन असे की, वरील वस्तुस्थिती असताना प्रतिवादीच्या वडीलांकडे त्यांची आई सुपडाबाई चिंतामण पावले राहत असल्याने अभिलाषा व स्वार्थ हेतूने तिला हाताशी धरुन सुपडाबाई व प्रतिवादीचे वडील निंबा चिंतामण पावले यांनी दावा मिळकतींच्या वाटणीसाठी व कब्जा मिळणेसाठी वादीविरुध्द रे.मु.नं.१७२/२०१४ चा दावा चाळीसगांव न्यायालयात दाखल केलेला आहे. प्रतिवादीचे वडील मयत झाल्यानंतर प्रतिवादी त्यात वादी म्हणून पक्षकार असून वादी हे प्रतिवादीचे काका आहेत. सदर रे.मु.नं. १७२/२०१४ चे दाव्याचे कामकाज प्रलंबित असताना प्रतिवादी हा दावा कलम १ अ यात वर्णन केलेल्या मिळकतींचे शेतजमिनींचे वादीचे प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीस दांडगाईने हरकत अडथळा करु लागला. सध्या शेतीच्या कामाचे दिवस असल्याने वादी शेतकामासाठी दि. १२.०६.२०२४ रोजी शेतीकामासाठी ट्रॅक्टर घेवुन जात असताना प्रतिवादी हा वादीस शेतात ट्रॅक्टर टाकु नका व हे शेत तुम्हाला पेरु देणार नाही असे म्हणून प्रतिवादीने वादीच्या दावा मिळकतीच्या प्रत्यक्ष वहिवाटीस हरकत अडथळा निर्माण केला. त्यानंतर दि. २१.०६.२०२४ रोजी देखील प्रतिवादीने वादीच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा निर्माण केला. त्याबाबत वादीने प्रतिवादीविरुध्द चाळीसगांव ग्रामीण पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे. वादी हा वयस्कर असल्यामुळे प्रतिवादी वादीचे दावा मिळकतीच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा निर्माण करीत राहिल्यास वादी त्याची शेतजमिन कसणे शक्य होणार नाही. सबब वादीने प्रतिवादीविरुध्द प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

**<u>प्रतिवादीची कैफियत व म्हणणे</u>**–

**६.** प्रतिवादीने दाव्यात हजर होवुन नि.क्र. १३ वर प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन वादीची कथने नाकारलेली आहे. प्रतिवादीने कथन केले की, दावा कलम १

मधील मिळकतीचे वर्णन बरोबर आहे. परंतु सदर मिळकतीच्या वर्णनाखाली नमुद केलेल्या चतुःसिमेबाबत वादीने दाव्यासोबत चतुःसिमेचा नकाशा दाखल करणे आवश्यक होते. परंतु वादीने दाव्यासोबत नकाशा दाखल केलेला नाही. प्रतिवादीने प्रस्तुत अर्जातील सर्व कथने स्पष्टपणे नाकरलेली आहे. प्रतिवादीचे म्हणणे असे की, प्रतिवादीचे वडील निंबा चिंतामण पावले व प्रतिवादीची आजी कै. सुपडाबाई चिंतामण पावले यांनी या वादीविरुध्द दावा क्र. रे.मु.नं.१७२/२०१४ चा दावा मिळकत व अन्य मिळकतींच्या वाटणीसाठी दाखल केलेला आहे. सदरील रे.मु.नं. १७२/२०१४ या दाव्यात नमुद केलेल्या मिळकती व वादीने दाखल केलेल्या मिळकती व या दाव्यातील मिळकती या एकत्र कुटुंबाच्या मिळकती व काही एकत्र कुटुंबाच्या मिळकतीतुन विकत घेतलेल्या मिळकती आहेत. वादी व प्रतिवादीचे वडील नामे कै.निंबा चिंतामण पावले यांच्या वाटण्या झालेल्या आहेत किंवा कसे ही बाब सिध्द झालेली नाही. प्रतिवादीचे वडील निंबा चिंतामण पावले यांचे दि.२१.०२.२०२१ रोजी निधन झालेले असून प्रतिवादीची आजी (वडीलांची आई) नामे सुपडाबाई चिंतामण पावले हिचे निधन प्रतिवादीच्या वडीलांचे निधनापुर्वी म्हणजेच दि. २८.१०.२०१७ रोजी झालेले आहे. प्रतिवादीच्या वडीलांच्या निधनानंतर त्यांचे कायदेशीर वारस म्हणून या प्रतिवादीचा व इतरांचा सदरील दाव्यात वादीपणात समावेश करण्यात आलेला आहे.

**७.** प्रतिवादीचे कथन असे की, रे.मु.नं. १७२/२०१४ या दाव्याचे कामकाज जवळजवळ पुर्ण होण्याच्या परिस्थितीत आहे. त्या अगोदरच वादी हा या दाव्यात नमुद केलेल्या मिळकतीबाबत मनाई हुकूमाची मागणी करुन प्रतिवादीने दाखल केलेल्या रे.मु.नं. १७२/२०१४ या दाव्यात कायदयाने अडचणी निर्माण करीत असल्याचा प्रयत्न करीत आहे. वादीने दाव्यात नमुद केलेल्या मिळकती या वादी हा कधीही स्वतः खेडत नव्हता व उत्पन्न घेत नव्हता. कारण वादी हा सन १९८३ पासुन रेल्वेत खलाशी म्हणून नोकरीस असल्याने दावा मिळकती तो स्वतः खेडण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. वादी हा कधीही गावी राहिलेला नाही. वादी हल्ली त्याच्या परिवारासह चाळीसगांव येथे राहतो. वादी जवळ कोणत्याही प्रकारचे शेतीचे अवजारे व गुरेढोरे नाहीत. वादीने नमुद केल्याप्रमाणे प्रतिवादीने दि. १२.०६.२०२४ रोजी कामासाठी ट्रॅक्टर घेवुन जात असताना हरकत व अडथळा केला ही बाब निराधार असून विश्वासर्ह नाही. वादीच्या अर्जातील मागणी योग्य व कायदेशीर नाही.

त्यामुळे वादीचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली.

८. वादीतर्फे सुविद्य विधिज्ञ श्री.पी.डी.बोंदार्डे यांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादीतर्फे सुविद्य विधिज्ञ श्री.एस.बी.पाटील यांचा युक्तिवाद ऐकला. वादी व प्रतिवादींच्या विधिज्ञांनी वाद पत्रातील व कैफियतीमधील कथनांच्या अनुषंगाने सुसंगत युक्तिवाद सांगितला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

९. वादी यांची कथने व वादीकडुन दाखल कागदपत्रे आणि वादीतर्फे युक्तीवाद यावरुन प्रस्तुतचे अर्जाचे अनुषंगाने माझे पुढे पुढील मुद्ये उपस्थित होत आहे. सदर मुद्ये व त्यावरील निष्कर्ष त्या खालील कारणांवरुन पुढील प्रमाणे नोंदविण्यांत येत आहे.

| अ. क्र. | मुद्ये | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी हे प्रथमदर्शनीय केस सिध्द करतात काय ? | होय. |
| २ | न्यायाचा समतोल वादीचे बाजुने आहे काय ? | होय. |
| ३ | प्रस्तुत तुर्तातूर्त मनाई ताकिदीचा अर्ज नाकारल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे काय ? | होय. |
| ४ | आदेश काय ? | अर्ज मंजुर करणेत येत आहे. |

## <u>का र ण मि मां सा</u>

### <u>मुद्ये क्र. १ ते ४ साठी एकत्रीतपणे</u> :–

**१०.** उपरोक्त चारही मुद्यांचे निष्कर्ष एकमेकांवर विसंबुन असल्याने विवेचनाची पुनरावृत्ती टाळणेसाठी सर्व मुद्ये एकत्रीतपणे चर्चिले आहेत.

**११.** वादी व प्रतिवादीच्या मान्य केलेल्या कथनावरुन दावा मिळकतीचे वर्णन बरोबर आहे याबाबत उभयपक्षाचे दुमत नसल्याचे दिसते. त्याचप्रमाणे प्रस्तुत दाव्यातील

प्रतिवादी व इतर अशांनी रे.मु.नं. १७२/२०१४ चा दावा या वादी विरुध्द दाखल केलेला आहे याबाबत देखील दोन्ही पक्षकारांमध्ये वाद नसल्याचे स्पष्ट होते. असे असताना वादीचे कथनानुसार शेतजमिन गट क्र. १/क/क१ क्षेत्र १ हे. ६७ आर ही शेतजमिन वादी व प्रतिवादीचे वडील मयत निंबा चिंतामण पावले यांची एकत्र हिंदू कुटुंबाची शेतजमिन होती व सदर मिळकतीची वादी व प्रतिवादीचे वडील निंबा चिंतामण पावले यांच्या दरम्यान दि. ०४.०३.२००५ रोजी वाटणी होवुन त्यानुसार दावा कलम १अ यात वर्णन केलेली शेतमिळकत ही वादीच्या वाटणीस व शेत गट क्र. १क/क/१/ब चे क्षेत्र १ हे. ०३ आर, आकार ५ रु. .०० पैसे ही शेतजमिन प्रतिवादीचे वडील निंबा चिंतामण पावले यांच्या वाटणीस आलेली होती. याउलट प्रतिवादीचे म्हणणे असे की, दावा मिळकती या एकत्रकुटुंबाच्या मिळकती व काही एकत्र कुटुबाच्या मिळकतीतून विकत घेतलेल्या आहेत. वादी व प्रतिवादीच्या मान्य व कबुल असलेल्या तथ्यावरुन दावा मिळकत गट क्र. १/क/क१ क्षेत्र १हे. ६७ आर ही शेतजमिन वादी व प्रतिवादीच्या एकत्र हिंदु कुटुबांची शेतजमिन होती याबाबत दुमत नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे वादी व प्रतिवादीचे परस्पर विरोधी वाद कथनाच्या अनुषंगाने अभिलेखावरील कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन करणे आवश्यक आहे.

**१२.** नि.क्र.१६/१ वरील दि. ०२.०३.२००५ रोजीचे नोंदणीकृत वाटणीपत्राच्या प्रतीचे अवलोकन केले असता वादी मधुकर पावले व वादीची आई सुपडाबाई चिंतामण पावले आणि प्रतिवादीचे वडील निंबा चिंतामण पावले यांच्या मध्ये दावा मिळकत गट क्र. १/क/क१ एकूण क्षेत्र १हे. ६७ आर या जमिनीची आपसात वाटणी केलेली असून वादीस सदर गट क्र. १/क/क१ मधील ०हे. ६४ आर एवढी जमीन वाटणीस दिलेली असल्याचे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे दि. ०२.०३.२००५ रोजीच्या नोंदणीकृत वाटणीपत्राच्या प्रतीचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनीय असे दिसुन येते की, सदर वाटणीमध्ये प्रतिवादीचे वडील निंबा चिंतामण पावले यांच्या हिश्यास गट क्र. १/क/क१ मधील क्षेत्र ०१ हे. ०३ आर इतकी जमीन सदर नोंदणीकृत वाटणीपत्राआधारे दिलेली आहे. त्याचप्रमाणे सदर वाटणीपत्रावरुन वादीची आई सुपडाबाई पावले यांनी त्यांचे वाटणी हिश्यास शेती ऐवजी रु. २०,०००/- लिहून ठेवणार वादी मधुकर पावले व प्रतिवादीचे वडील निंबा चिंतामण

पावले यांच्याकडून रोख स्वरुपात घेवुन सदर जमिनीवरील त्यांचा हिस्सा सोडून दिलेला आहे. दि. ०४.०३.२००५ रोजीचे वाटणीपत्रावरुन वादी मधुकर पावले, वादीची आई सुपडाबाई पावले व प्रतिवादीचे वडील निंबा चिंतामण पावले यांच्यामध्ये गट क्र. १/क/क१ क्षेत्र १हे. ६७ आर या जमिनीचे नोंदणीकृत वाटणीपत्राआधारे वाटणी झाल्याचे प्रथमदर्शनीय दिसुन येते. सदर वाटणीपत्राआधारे वादी मधुकर पावले यांना गट क्र. १/क/क१ मधील क्षेत्र ६४ आर ही जमीन प्रत्यक्षात ताब्यात दिलेले असल्याचे प्रथमदर्शनीय दिसुन येते.

**१३.** नि.क्र. ३/१ वरील ७/१२ पत्रकाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, गट क्र. १/क/क१/अ क्षेत्र ०हे ६४ आर या दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रका सदरी वादी मधुकर चिंतामण पावले यांच्या नावाची नोंद झालेली आहे. यावरुन सन २००५ पासुन वादीची दावा मिळकत गट क्र. १/क/क१/अ या शेतजमिनीमध्ये अखंडपणे व शांततामय कब्जे वहिवाट असल्याचे प्रथमदर्शनीय दिसुन येते. वास्तविकरित्या दि. ०४.०३.२००५ रोजीचे नोंदणीकृत वाटणीपत्र कायदेशीर आहे किंवा कसे हे दाव्याचे अंतिम गुणदोषावर ठरणार आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्याचा निकालापावेतो वादीची दावा मिळकतीतील कब्जे वहिवाटीचे संरक्षण करणे न्यायाच्या कारणास्तव आवश्यक आहे. तसेच प्रतिवादीने वादीचा सदर दावा मिळकतीमधील मालकी हक्क नाकारलेला आहे. त्यावरुन प्रतिवादी हे वादीच्या दावा मिळकतीतील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा निर्माण करीत आहे असे प्रथमदर्शनीय सिध्द होते.

**१४.** वादीचे कथन असे की, वादी हा सन १९८३ पासुन हेल्पर खलाशी म्हणून नोकरीस होता व त्यावेळी वादीची आई सुपडाबाई ही त्याच्याकडे राहत होती. वादीचे कथन असे की, वादी याने त्याच्या नोकरी उत्पन्नातुन दावा कलम १ब यात वर्णन केलेली शेतजमिन दि. ११.०३.१९९७ रोजी श्री. सुनिल देवराम भावसार यांच्याकडून रक्कम रु. १,५८,०००/- खरेदी घेतली. त्यावेळी आईचा मान म्हणून वादीने त्या जमिनीचे खरेदीखत आईच्या नावाने करुन घेतले परंतु आईच्या मृत्युनंतर पुढे वाद नको म्हणून

वादीच्या आईने सदरची जमिन दि. ०७.०१.१९९९ रोजी कार्यकारी दंडाधिकारी साो चाळीसगाव यांच्या समक्ष विनाविलंब हक्कसोड वाटणीद्वारे वादीच्या नावाने करुन दिली. वादीच्या कथनानुसार नोंद क्र. २८०८ ने सदर मिळकत वादीच्या नावावर झाली व तेव्हापासुन मालकी हक्काने ती जमिन वादीचे कब्जे उपभोगात होती व आहे. मात्र प्रतिवादीने वादीची सर्व कथने नाकारलेली आहे. वादीच्या कथनाच्या अनुषंगाने अभिलेखावरील दि. ११.०३.१९९७ रोजीचे खरेदीखताच्या प्रतीचे अवलोकन करणे आवश्यक आहे. दि. ११.०३.१९९७ रोजीचे खरेदीखताचे अवलोकन केले असता दावा मिळकत गट क्र. १/क/क/२ मधील क्षेत्र ०१हे. ६७ आर ही शेतजमिन वादीची आई सुपडाबाई चिंतामण पावले यांनी सुनिल देवराम भावसार यांच्याकडून रक्कम रु. १,५८,०००/– मोबदला देवुन खरेदी केल्याचे स्पष्ट होते. अभिलेखावरील दि. ०७.०१.१९९९ चे विनामुल्य हक्क सोड वाटणी पत्राचे अवलोकन केले असता वादीची आई सुपडाबाई चिंतामण पावले यांनी गट क्र. १/क/क/२ मधील तिचा हक्क विनामुल्य हक्क सोड वाटणीद्वारे वादीच्या नावावर करुन दिलेले असल्याचे स्पष्ट होते. दि. ०७.०१.१९९९ रोजीचे विनामुल्य हक्कसोड वाटणी पत्राचे अवलोकन केले असता वादीची आई श्रीमती सुपडाबाई पावले हिने गट क्र. १/क/क/२ क्षेत्र १ हे. ६७आर ही मिळकत तिची स्वसंपादीत, विकत घेतलेली असून तिच्या कब्जे व उपभोगातील असल्याचे नमुद केलेले आहे. सदर दस्तऐवजावरुन वादी यांची आई सुपडाबाई हिने गट क्र. १/क/क/२ क्षेत्र १हे. ६७ आर या मिळकतीमधील दि. ०७.०१.१९९९ रोजी कार्यकारी दंडाधिकारी चाळीसगाव यांच्या समक्ष तिचा विनामुल्य हक्कसोड वाटणी पत्राद्वारे हक्कसोडून वादीच्या नावाने सदरची जमीन करुन दिलेली असल्याचे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे फेरफार क्र. २८०८ चे अवलोकन केले असता गट क्र. १/क/क/२ क्षेत्र ०१ हे. ६७ आर या मिळकती सदरी विनामुल्य हक्कसोड वाटणीपत्राद्वारे वादीच्या नावाची नोंद होवुन तसा फेरफार मंजुर झाल्याचे दिसुन येते. वास्तविकरित्या प्रतिवादीने सन १९९७ पासुन सदरचे दि. ११.०३.१९९७ रोजीचे खरेदीखत कोठेही

आव्हानीत केलेले नाही. त्याचप्रमाणे प्रतिवादीने फेरफार क्र. २८०८ ही नोंद देखील आज अखेर कोणत्याही सक्षम न्यायालयात आव्हानीत केलेली नसल्याचे प्रतिवादीच्या कैफियतीवरुन स्पष्ट होते. त्यामुळे प्रतिवादीचे सदरचे वर्तन हे निश्चितच प्रतिवादीस प्रतिकुल ठरते. तसेच नि.क्र. ३/२ वरील दावा मिळकतीचे ७/१२ पत्रकावरुन गट क्र. १/क/क/२ या शेतजमिन मिळकती सदरी वादीच्या नावाची नोंद असल्याचे दिसुन येते. एकंदर अभिलेखावरील वादीच्या कथनावरुन व दस्तऐवजावरुन वादीची दावा मिळकत गट क्र. १/क/क/२ या शेतजमिनीमध्ये सन १९९९ रोजीपासुन शांततामय व अखंडपणे कब्जेवहिवाट असल्याचे प्रथमदर्शनीय दिसुन येते. नि.क्र.१६/५ वरील अदखलपात्र गुन्हयाच्या प्रथमखबरी अहवालावरुन देखील प्रतिवादी हे वादीचे दावा मिळकतीतील कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा करीत आहे असे सकृतदर्शनीय दिसुन येते.

**१५.** एकंदरीतरित्या वादीची दोन्ही दावा मिळकतींमध्ये शांततामय व अखंडपणे कब्जेवहिवाट आहे असे अभिलेखावरील दावा मिळकतीचे वाटणीपत्र, खरेदीखत, फेरफार व महसुल अभिलेखावरुन दिसुन येते. तसेच प्रतिवादीने त्याचे कैफियतीमधील कथनांचे पृष्टर्थ कोणताही सबळ पुरावा दाखल केलला नाही. याउलट प्रतिवादीने वादीची दावा मिळकतीतील कब्जेवहिवाट व मालकी हक्क नाकारलेली आहे. यावरुन प्रतिवादी हे वादीच्या दावा मिळकतीमधील कब्जेवहिवाटीस हरकत व अडथळा करीत आहेत असे स्पष्ट होते. मुळातच वादीने अभिलेखावर दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्यावरुन वादीची दावा मिळकतीत कब्जेवहिवाट आहे असे प्रथमदर्शनीय वादीने सिध्द केलेले आहे. त्यामुळे वादीस प्रथमदर्शनीय केस असुन न्यायाचा समतोल वादीचे बाजुने आहे. असे असतांना प्रस्तुतचा अर्ज नामंजुर केलेस वादीचे पैशाचे न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याउलट अर्ज मंजुर केलेस प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. वरील विवेचनावरुन वादी समन्यायी तत्वाची तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा आदेश मिळणेस पात्र आहे. सबब मी मुद्दा क्रं.१ ते ३ करीता निष्कर्ष होकारार्थी नोंदवित असुन मुद्दा क्रं.४ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

अ) निशाणी क्र.६ वरील तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज मंजुर करणेत येत आहे.

ब) प्रतिवादीने स्वतः अगर तर्फे त्रयस्थ इसमांमार्फत प्रस्तुत दाव्याच्या निकालापावेतो वादीचे दावा मिळकतीतील कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा करु नये असा तुर्तातूर्त मनाईचा आदेश प्रतिवादीविरुध्द देण्यात येत आहे.

क) अर्जाचा खर्च दाव्यात आकारण्यात येईल.

(आदेश खुल्या न्यायदान कक्षेत सांगुन घोषित करणेत आला.)

SHRIJA RAJENDRA SHINDE

Digitally signed by SHRIJA RAJENDRA SHINDE
Location: 3rd Jt. Civil Judge J. D., Chalisgaon
Date: 2024.10.19 12:49:40 +0530

(श्रीमती एस. आर. शिंदे)
३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)

दिनांकः-१८/१०/२०२४. चाळीसगांव.